# मुंबई विद्यापीठ

संचालक, परीक्षा व
मुल्यमापन मंडळ, मुंबई
विद्यापीठ, मुंबई ४०००९८

---

## परिपत्रक

No. DBoEE/ICC/2021-22/26

विषय : शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मधील प्रथम सत्र उन्हाळी (मार्च/एप्रिल २०२२) विद्यापीठाच्या शैक्षणिक विभगांच्या परीक्षेच्या आयोजनाबाबत.

संदर्भ : क. १) परिपत्रक No. DBoEE/ICC/2021-22/23 दिनांक २३/०२/२०२२
क. २) परिपत्रक No. DBoEE/ICC/2021-22/24 दिनांक ०४/०३/२०२२

विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे, कल्याण व सिंधुदुर्ग उपपरिसरांचे समन्वयक/ संचालक, यांना या परिपत्रकाद्वारे कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष २०२१-२२मधील प्रथम सत्र उन्हाळी (मार्च/एप्रिल २०२२) परीक्षेच्या आयोजन संदर्भात परीक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार सर्व संबधितांनी परिक्षेच्या आयोजना संदर्भात परीक्षा व मुल्यमापन मंडळाने घेतलेल्या निर्णयानुसार उपरोक्त संदर्भांकित परिपत्रक कमांक १ व २ अन्वये कळविण्यात आलेले आहे. तथापि, विद्यापीठाच्या शैक्षणिक विभागांच्या विभाग प्रमुखांनी परीक्षेच्या आयोजना संदर्भात खालील प्रमाणे कार्यवाही करावी.

1) पदवी परीक्षांसाठी उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकांत नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी.

2) पदव्युत्तर सत्र १ व ३ बॅकलॉग परीक्षा ऑनलाईन/ऑफलाईन पद्धतीने घेण्यात याव्यात.

3) पदव्युत्तर सत्र २ व ४ नियमित व बॅकलॉग ह्या परीक्षा ऑफलाईन पद्धतीने आपल्या विभाग स्तरावर घेण्यात याव्यात.

4) पदव्युत्तर सत्र २ व ४ नियमित व बॅकलॉग परीक्षेसाठी ५०% बहुपर्यायी प्रश्न (MCQ Type) व ५०% वर्णनात्मक प्रश्न (Descriptive Type ) किंवा सर्व १००% वर्णनात्मक प्रश्न या पद्धतीने परीक्षा घेण्यात याव्यात. या परीक्षांसाठी विभागाने वेळापत्रक जाहिर करावे, प्रश्नसंच तयार करावेत व परीक्षा झाल्यानंतर उत्तरपुस्तिकांचे मुल्यमापन विभागात करून परीक्षेचे गुण ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करावेत.

5) ज्या विभागातील अभ्यासक्रम हे महाविद्यालयातील अभ्यासक्रमांसारखेच असतील अशा विभागांनी महाविद्यालयांसाठी ज्या मार्गदर्शक सुचना उपरोक्त संदर्भांकित परिपत्रकांत नमुद केल्याप्रमाणे कार्यवाही करावी किंवा विभाग प्रमुख यांनी आपल्या स्तरावर मुद्दा क्रमांक ४ प्रमाणे कार्यवाही करावी.

6) विभाग प्रमुखांनी ऑफलाईन परीक्षा घेण्यासाठी आवश्यक ती स्टेशनरी परीक्षा विभागाकडून उपलब्ध करून घ्यावी.

7) पदव्युत्तर सर्व सत्रांच्या परीक्षा हया १० जुन २०२२ पर्यंत संपविण्यात याव्यात व १६ जुन २०२२ पर्यंत गुण ऑनलाईन पोर्टलवर अपलोड करावेत.

ठिकाण : मुंबई
दिनांक : २३ /०३/२०२२

(डॉ. विनोद पाटील)
संचालक
परीक्षा व मुल्यमापन मंडळ

**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी :**

१) विद्यापीठाच्या विविध शैक्षणिक विभागांचे संचालक/विभाग प्रमुख, विद्यापीठाच्या रत्नागिरी, ठाणे व कल्याण उपपरिसरांचे समन्वयक/ संचालक,
२) सर्व उपकुलसचिव, परीक्षा विभाग, विद्यानगरी परिसर, मुंबई विद्यापीठ, मुंबई
३) स्वीय सहाय्यक : १) कुलगुरु २) प्र–कुलगुरु ३) कुलसचिव
४) स्वीय सहाय्यक अधिष्ठाता, विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई
५) स्वीय सहाय्यक अधिष्ठाता, मानव्य विज्ञान विद्याशाखा, मुंबई विद्यापीठ, मुंबई